कृपया प्रसिद्धीसाठी / दि. २५ ऑगस्ट २०११

# तारापूर अणुऊर्जा प्रकल्प पीडितांना भाडयापोटी रु.२० लाख मिळणार

मुंबई, गुरुवार : तारापूर अणुऊर्जा प्रकल्पातील १६३ कुटुंबाना घरभाडयापोटी रु.२० लाख ३७ हजार देण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई आणि न्यायमूर्ती रणजित मोरे यांच्या खंडपीठाने आज दिला. तारापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या प्रकल्प पीडितांनी केलेल्या रिट याचिकेमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या वतीने ॲड.राजीव पाटील आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री राम नाईक यांनी बाजू मांडली तर न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनतर्फे ॲड.राजेश कुमार आणि ॲड.एल.ए.मुनीम व महाराष्ट्र सरकारच्या वतीने ॲड. नितीन देशपांडे यांनी बाजू मांडली.

या प्रकरणी अधिक माहिती देताना श्री राम नाईक म्हणाले, ''तारापूर अणुऊर्जा प्रकल्प ३ व ४ मधून १०८० मेगावॅट वीजेचे उत्पादन सुरु होऊन पाच वर्षे पूर्ण झाली तरीही प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न रेंगाळत आहेत. त्यामधील एक विषय होता : पर्यायी घरे बांधून देईपर्यंत प्रत्येक कुटुंबात घरभाडयापोटी दरमहा रु.२,५०० देणे. त्यापैकी ऑगस्ट २००६ पर्यंत १६३ कुटुंबियांना भाडे देण्यात आले नाही. एकूण थकबाकी रु.२० लाख ३७ हजार होती. या प्रकरणी न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन आणि महाराष्ट्र सरकार एकमेकावर भाडे देण्याची जबाबदारी टाकत होते. परिणामी प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी वाढत होत्या. उच्च न्यायालयात सर्वांनी बाजू मांडल्यानंतर तात्पुरता उपाय म्हणून महाराष्ट्र सरकारने तीन आठवडयात भाडे द्यावे, तसेच ही जबाबदारी कुणाची हे दोघानी चर्चा करुन ठरवावे. त्यामध्ये एकमत न झाल्यास न्यायालय आदेश देईल असे खंडपीठाने सांगितले.''

रिट याचिकेतील दुसरी प्रमुख मागणी म्हणजे मच्छिमारांचे पुनर्वसन. मच्छिमारांना मासेमारीसाठी समुद्र किनारी जागा देण्याचे मान्य करुन सहा वर्षे पूर्ण झाली तरी त्यांना अद्यापि जागा देण्यात आली नाही. राहण्यासाठी दिलेली जागा समुद्र किनाऱ्यापासून १० किलोमीटर दूर आहे. त्यामुळे मच्छिमारांचा व्यवसाय बुडाला असून त्यांची अक्षरशः उपासमार होत आहे, असे श्री राम नाईक यांनी खंडपीठाला सांगितले. खंडपीठाने पुढील सुनावणीच्या वेळी मच्छिमारांच्या प्रश्नावर विचार करण्याचे आश्वासन दिले असून पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

कार्यालय सचिव